# ‘सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा’ पुरस्कारांचे वितरण

**मुंबई : हॅलो प्रभात**

क्विक हील फाऊंडेशन या क्विक हील टेक्नॉलॉजीज लिमिटेडच्या सीएसआर शाखेने ‘सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा’ पुरस्काराच्या २०२५ आवृत्तीचे आयोजन केले.

या प्रतिष्ठित कार्यक्रमात भारतभरात सायबर सुरक्षा व जागरूकतेला चालना देण्याप्रती समर्पित स्वयंसेवी संस्था, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या अपवादात्मक योगदानांचा सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर युनिव्हर्सिटीचे उप-कुलगुरू डॉ. प्रकाश महानवार, तसेच क्विक हील येथील ऑपरेशल एक्सलन्सच्या प्रमुख व क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्ष श्रीमती अनुपमा काटकर यांनी उपस्थिती दाखवून या इव्हेन्टची शोभा वाढवली. तसेच, याप्रसंगी क्विक हीलची लीडरशीप टीम, जसे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. कैलाश काटकर, संयुक्त व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय काटकर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल साळवी देखील उपस्थित होते. ‘सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा’ उपक्रम तरूणांना नेतृत्व, सादरीकरण व डिजिटल शिक्षणामधील आवश्यक कौशल्यांसह सक्षम करण्यावर लक्ष केंद्रित करतो, तसेच आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी व्यासपीठ देतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रचारित केलेले ‘डिजिटल इंडिया’ व ‘आत्मनिर्भर भारत’ या उपक्रमांच्या दृष्टिकोनाशी संलग्न राहत



हा उपक्रम वंचित समुदायांना आवश्यक सायबर सुरक्षा ज्ञान देतो. १२० हून अधिक संस्थांसह सहयोग केला आहे, ४,६०० हून अधिक सायबर वॉरियर्सना प्रशिक्षण दिले आहे आणि शाळा व कॉलेजमधील ५५.९२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली आहे.